दिनांक -०६/०६/२०२० प्रेस नोट

भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | ५२४/२०२० कलम ४५४,४५७,३८० भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला |
| घटनास्थळ | प्रबुध्दनगर वडाळी अमरावती |
| घटना ता. वेळ | ०३.०६.२०२०चे १३.०० वा ते ०५.०६.२०२० चे वा. दुपारी १२.०० वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ | ०५.०६.२०२० चे १६.११ वा . |
| आरोपी | अज्ञात इसम |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | नाही. |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठीकाणी फिर्यादी ही तिचे घराला लाँक लावुन दोन मुलासह आपले मुलीच्या घरी गेली असताना फि.च्या मुलीच्या घरचे गँस सिलेंडर संपल्याने तिचे मुलाला गँस सिलेंडर घेण्यास घरी पाठविले असता मुलाला फिर्यादीच्या घरी आढळुन आले की ,कोणीतरी अज्ञात चोराने किचनचे खिडकी तोडुन घरात प्रवेश केला व घरातील लोंखडी आलमारीतील ५ ग्राम सोन्याचे कानातले कि.अ.१०,०००/-रु.व १० तोड्याच्या चांदीच्या तोरड्या अ.कि.४०००/-रु असा एकुन १४०००/-रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी नाव | पोउपनि बालाजी लालपालवाले पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |
| पो.नि. नाव | पो नी पुंडलिक मेश्राम पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |

२

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | ५२५/२०२० कलम ३२४,५०४ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला |
| घटनास्थळ | बिच्छु टेकडी राहुलनगर अमरावती |
| घटना ता. वेळ | ०५.०६.२०२० चे १५.३० वा. |
| दाखल ता. वेळ | ०५.०६.२०२० चे १९.५२ वा . |
| आरोपी | अभिजीत वय २५ वर्ष रा.बिच्छु टेकडी राहुलनगर अमरावती |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | होय |
| हकीकत | हककीत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी चा मुलगा वय १४ वर्ष हा खुल्या मैदानात त्याच्या २ भावासह क्रिकेट खेळत असताना त्यांच्या जवळील बाँल हा त्यांचे घरासमोर बसलेला आरोपी नामे अभिजीत याचे जवळ गेला असता तो परत आणनेकरीता फिर्यादी यांचा मुलगा गेला असता आरोपी याने शिवीगाळ करुन खाली पडलेला दगड हातात घेवुन फिर्यादी यांच्या मुलाच्या डोक्यात मारला .त्यामुळे त्याचे डोके फुटुन रक्त बाहेर येवु लागले अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट व मेडीकल सर्टी.वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी नाव | पोउपनि बालाजी लालपालवाले पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |
| पो.नि. नाव व मो.नं. | पो नी पुंडलिक मेश्राम पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | ५२६/२०२० कलम २९४,५०६(ब),३४ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला |
| घटनास्थळ | वरुननगर महादेवखोरी अमरावती |
| घटना ता. वेळ | ०५.०६.२०२०चे१९.३० वा. |
| दाखल ता. वेळ | ०५.०६.२०२० चे २३.३७ वा . |
| आरोपी | १)सुरेंद्र डोंगरे २)आशिष सगणे ३)सनी गोंडाने सर्व रा.महादेव खोरी अमरावती |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | नाही. |
| हकीकत | हककीत अशा प्रकारे आहे की यातील आरोपी क्रमांक १ हा फिर्यादीच्या घरासमोर आला व फिर्यादीच्या मुलगा अमोल याला आवाज दिला व म्हणाला की माझी मशीन दे फिर्यादीच्या मुलाने म्हटले की मशीन माझ्या कडे नाही असे म्हणताच आरोपी क्र.१ याने फिर्यादीच्या मुलास शिवीगाळ करण्यास सुरवात केली फिर्यादीने म्हटले की शिवीगाळ का करतो तर आरो़पी क्र.१ याने फिर्यादीस अश्लिल शिवीगाळ करुन तु कशी काय मध्ये बोलत आहे. अशा अश्लिल भाषेत शिवीगाळ केली व तेथे आरोपी क्रमांक २ व ३ आले त्यांनी सुध्दा शिवीगाळ केली तिन्ही आरो़पीतांनी जिवे मारण्याची धमकी दीली तिनही आरोपीतांचा तेथील मोहल्यातील लोकांना त्रास आहे अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी नाव | स.पो.उप.नि दिलीप अटाळकर ब.न.१४५ पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |
| पो.नि. नाव व मो.नं. | पो नी पुंडलिक मेश्राम पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |

४

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | नागपुरी गेट |
| अप क्र. व कलम | १९८/२०२० कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | अब्दुल राजीक अब्दुल सादीक वय २८ वर्षे धंदा- मजुरी रा. लालखडी मोठी मस्जीद जवळ अमरावती |
| घटनास्थळ | बिस्मील्ला नगर अमरावती |
| घटना. ता .वेळ | ०५/०६/२०२० चे १९/०० वा |
| दाखल .ता. वेळ | ०५/०६/२०२० चे २१/३० वा |
| आरोपी | (१)मोहम्मद सोनु वल्द अल्लाबक्श कुरैशी रा. हैदरपुरा अमरावती , (२) शेख अजहर शेख नजीर रा. बिस्मील्ला नगर अमरावती |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | नाही |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील नमूद फिर्यादी याचे घराजवळ १८/०० वा यातील नमुद आरोपी हे दारुचे नशेत शिवीगाळ करित होते त्यावरुन फिर्यादीने त्यांना समजावुन दिले . त्यानंतर नमुद घटना ता.वेळी फिर्यादी हा बिस्मील्ला नगर येथुन जात असतांना आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस पाहुन शिवीगाळ केली व म्हणाले की तु ज्यादा आगे आगे करता है असे म्हणुन आरोपी क्र. १ याने चाकु काढुन फिर्यादीचे डावे हाताचे कोहणी जवळ मारुन जख्मी केले व आरोपी क्र.२ याने फिर्यादीस पुन्हा मारण्याची धमकी दिली . अशा फिर्यादीचे जबानि रिपोर्ट व मेडीकल सर्टीफिकेट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपास अधिकारी नाव | पो.उप.नि. पुरषोत्तम ठाकरे पोस्टे नागपुरी गेट अमरावती शहर |
| वरिष्ठ पोलीस निरिक्षक | व.पो.नि अर्जुन ठोसरे सा. पोस्टे नागपुरी गेट |

| पोलीस स्टेशन | राजापेठ |
|---|---|
| अप क्र. व कलम | अप क्र. ३८१/२०२० कलम ३६३ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला |
| घटनास्थळ | जुना सातुर्णा अम. |
| घटना ता. वेळ | दि. ०४/०६/२०२० चे १८.३० वा. |
| दाखल ता. वेळ. | दि. ०५/०६/२०२० चे १६.३६ वा. |
| आरोपी | अज्ञात |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | नाही |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातीस नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फि. हिने पोस्टेला रिपोर्ट दिला की, तिची मुलगी वय १५ वर्ष ही कुणाला काही न सांगता घरुन निघुन गेली ती वारंवार घरुन निघुन जाण्याच्या सवईची असुन यापुर्वीही ती घरुन निघुन गेली आहे सदर मुलगी ही अल्पवयीन असल्याने फि. चे रिपोर्ट वरुन गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| तपासी अमलदार | पोउपनि नरवाडे पोस्टे राजापेठ |

## भाग -६ गुन्हे बाबत-१

| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
|---|---|
| अप क्र. व कलम | अप क्र ४३४/२०२० कलम २९४, ५०४, ५०६ भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | एक महिला |
| घटनास्थळ | केवल कॉलनी बायस्कर ले आउट अमरावती |
| घटना ता. वेळ | ०५.०६.२०२० चे १८.३० वा |
| दाखल ता. वेळ | ०५.०६.२०२० चे २१.४० वा |
| आरोपी | विजय अंबादास वानखडे व त्याचे मित्र रा सिध्दार्थ नगर अमरावती |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | नाही |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | .हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी एका महिलेकडुन नमुद घटनास्थळ वरील हॉल भाडयाने घेतला असुन तो फिर्यादी व त्याचे पती साफ सफाई करित असतांना आरोपी हा त्याचे मित्रासह तेथे येवुन फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपसात घेतला. |
| तपासी अमलदार | सपोनि मनिष वाकोडे पोस्टे गाडगे नगर अमरावती |

# प्रोव्हीशन रेड-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलम | ३९२/२०२० कलम ६५ (ई) म.दा.का. |
| फिर्यादी नाव व पत्ता | सरतर्फे नापोकॉ शैलेश मोरे ब.नं. १०२९ पोलीस स्टेशन बडनेरा अमरावती |
| घटनास्थळ | भगतसिंग चौक जुनी वस्ती बडनेरा |
| घटना ता. वेळ | ०५/०६/२०२० चे १२:३० वाजता |
| दाखल ता. वेळ | ०५/०६/२०२० चे १४:०३ वाजता |
| आरोपी /चे नाव व पत्ता | राजु रामराव रोतळे वय ४८ वर्ष रा.बारीपुरा जुनी वस्ती बडनेरा |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | समजपत्रावर रिहा...................... |
| मिळाला माल | १० नग देशी दारू बॉबी संत्रा १८० एम.एल. च्या पावटया कि.अं. ५५०/— रूपया चा माल |
| गुन्हयांची थोडक्यात हकीकत | सदर गुन्हयाची हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपीवर जप्ती पंचनाम्यातील पंचा समक्ष प्रोव्हीशन रेड केला असता नमुद आरोपीचे ताब्यातुन अवैध्य रित्या १० नग देशी दारू बॉबी संत्रा १८० एम.एल. च्या पावटया कि.अं. ५५०/— रूपया चा माल पंचा समक्ष जप्त करुन ताब्यात घेतला. नमुद आरोपी इसमांचे कुत्य कलम ६५ (ई) महा. दारूबंदी कायद्याप्रमाणे होत असल्याने नमुद आरोपी विरूध्द सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपास अधिकारी नाव | नापोकॉ शैलेश मोरे ब.नं. १०२९ पोलीस स्टेशन बडनेरा अमरावती |